**CNR NO-MHSO060007602020**

**नियमित दिवाणी दावा क्र.८५/२०२०**

**आय.ए.क्र. २/२०२२**
अंबादास रंगनाथ भुसनर
**वि.**
**महाराष्ट्र सरकार व इतर.**

## नि. क्र. ५८ वरील आदेश
## (घोषित दि. २२/०९/२०२२)

०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.८ ते १९ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी असे नमूद केले की, सन २०२१ मध्ये न्यायालयाच्या आदेशानुसार वादीने दाव्यात दुरुस्ती केली परंतु त्यानंतर प्रतिवादींना नोटीस मिळाली नाही, मागील तारखेस वादीच्या वकीलांनी दिलेल्या तोंडी सुचनेनुसार तारखेची माहिती मिळाली सबब दि.३०/०८/२०२२ रोजी प्रतिवादींनी वकिलांमार्फत हजर राहण्याची पुरसीस दाखल केली. दाव्याच्या दुरुस्तीनंतर त्यांनी कैफियत दाखल करण्यास जाणीवपुर्वक विलंब केलेला नाही, दावा स्थावर मिळकतीबाबत असल्याने त्यांची कैफियत पटलावर असणे अत्यंत आवश्यक आहे. अश्या परिस्थतीमध्ये कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत पटलावर घेण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] वादीतर्फे अर्जास विरोध करुन असे नमूद करण्यात आले की, प्रतिवादींनी जाणीवपुर्वक कैफियत दाखल करण्यास विलंब केलेला आहे सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०३] उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०४] प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव होवून मिळणेकरीता व इतर मागण्यांकरीता दाखल करण्यात आलेला असून प्रस्तुतच्या दाव्यात प्रतिवादी क्र. ८ ते १९ यांचेदेखील हक्क तथा अधिकार गुंतलेले आहेत. अर्जामध्ये नमूद केल्यानुसार दाव्यात दुरुस्ती करण्यात आली होती परंतु त्यानंतर प्रतिवादींना नोटीस पाठविली नाही असे दिसून येते.

दि.३०/०८/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. ८ ते १९ यांचेमार्फत नि.क्र.५३ व्दारे दाव्यात हजर होत असल्याचे पुरसीसव्दारे कळविण्यात आले. त्यानंतर आजरोजी प्रस्तुतचा अर्ज कैफियतीसह दाखल करण्यात आलेला आहे.

०५] प्रस्तुतचा दावा गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता प्रतिवादींची कैफियत पटलावर असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.८ ते १९ यांनी जरी विलंबाने कैफियत दाखल केली तरी त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान झालेले नाही, दाव्याचे कामकाज लांबणीवर पडलेले नाही. एकंदरितच सर्व परिस्थतीचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.८ ते १९ यांना विलंबाने कैफियत दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचीत असल्याचे माझे मत झाले आहे करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ८ ते १९ यांना विलंबाने कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते, त्यांनी दाखल केलेली कैफियत पटलावर घेण्यात यावी.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2022.09.22 13:50:37 +0530

**दि.२२/०९/२०२२.**

**(अमित अ.खंडाळे)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपुर.**
**J.O.CODE-1828**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 22.09.2022 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 22.09.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 22.09.2022 |